**शपथेवर उलटतपास ॲड. श्री.वानखेडे गैरअर्जदारातर्फे** :–

१२. मी १० वी नापास आहे. माझे लग्न १४, मे,२००७ रोजी झाले. मला एक मुलगा व एक मुलगी आहे. मुलगा १० वी मध्ये व मुलगी १२ वी मध्ये शिकत आहे. मी दि.०१/०७/२००५ रोजी सेवेत चौकीदार म्हणुन रूजु झालो. हे म्हणणे खरे नाही की, मला दि.०१/०७/२००७ रोजी कामावरून कमी करण्यात आले. साक्षदार स्वत: सांगतो की, मला दि.१४/०८/२००७ रोजी तोंडी आदेशान्वेय कामावरून कमी करण्यात आले. आता मला माझी मुळ तक्रार दाखविली त्यामध्ये गैरअर्जदाराने मला दि.०१/०७/२००७ रोजी तोंडी आदेशाने कामावरून कमी केल्याचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रार ही वकीलांनी माझे सांगणेप्रमाणे लिहिली आहे व त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेली तक्रार ही खोटी होती. माझे मुळ तक्रारीमध्ये पुर्वीचे विधीज्ञ सदर तारीख ही चुकीची नमुद केलेली आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी मुळ तक्रारमध्ये अर्ज देउन दुरूस्ती केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नविन दुरूस्ती तक्रारमध्ये सुध्दा मला कामावरून तोंडी आदेशाने कमी केल्याची तारीख सुध्दा दि.०१/०७/२००७ ही नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी गैरअर्जदार यांचेकडे दोन वर्ष काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी गैरअर्जदार यांचेकडे ०१/०७/२००५ ते ०१/०७/२००७ असे दोन वर्ष काम केले. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन वर्षाचे काळात मला प्रोबेशन ठेवण्यात आले होते. आता मला माझी तक्रार दाखविली. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये मी दाने वर्ष प्रोबेशनवर होते असे नमुद केले आहे. साक्षदार स्वत: सांगतो की, सदर मजकुर हा पुर्वीचे वकीलांनी चुकीचा नमुद केलेला आहे.हे म्हणणे खरे नाही की, माझा परीविक्षा कालावधी हा समाधान रित्या पुर्ण न झाल्यामुळे मला कामावरून कमी केले आहे.

१४.        हे म्हणणे खरे आहे की, मला तक्रार दाखल करण्यास विलंब झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार हे नि.यु.२९, वर  नमुद पत्त्यावर मला पत्र व्यवहार करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी अंजली हेअर सलुन मध्ये दोजंदारीने काम करीत होतो. १० ते १२ वर्षापासुन मी हेअर सलुनमध्ये रोजंदारीने काम करीत होतो. कागदपत्र यादी नि.सि.१४ सोबत अनु. १ ते ४ वरील फोटोग्राफ मला दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, सदर फोटोग्राफ मध्ये मी काम करतांन दिसुन येतो. सदर ४ फोटोग्राफला अनु.नि.**सि.१५ ते १८** देण्यात आले.

१५.     कागदपत्र नि.सि.१४ सोबत अनु.५ वरील विजपुरवठा देयकाची प्रत मला दाखविली. त्यामध्ये ग्राहक म्हणुन माझे नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिटर हे आज रोजी सुध्दा माझे नावाने आहे. साक्षदार स्वतः सांगतो की,सन,२०१७ साली हेअर सलुनचे दुकान नगर पंचायतने पाडले होते. व तेंव्हापासुन दुकान बंद आहे व मिटर सुध्दा बंद आहे.  हे म्हणणे खरे आहे की, वरील विज देयक बिल हे हेअर सलुन दुकानाचे बिल आहे. सदर बिलाला नि. **सि.१९** देण्यात आले.

कोर्ट प्रश्नः— विज मिटर विज कंपनीला परत करून देण्याची प्रक्रीया तुंम्ही केलेली आहे का?

उत्तर — सदर प्रक्रीया मी केलेली नाही.

१६.     हे म्हणणे खरे आहे की, हेअर सलुनचे मिटर हे दि. ०३/०८/२०१२ ला जोडले होते.  हे म्हणणे खरे नाही की, ०३/०८/२०१२ पुर्वीपासुनच माझे हेअर सलुनचे दुकान तिथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, विज मिटर हे दुकानाचा मालक असल्याने माझे नावाने घेण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, हेअर सलुनचे दुकान हे बसस्टॅंडच्या मागे शासनाच्या जागेवर होते. हे म्हणणे खरे आहे की, कागदपत्र यादी नि.सि.१४ सोबत अनु.८ वरील

नोटीसची स्थळ प्रतीची छायांकित प्रत  मला दाखविली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर सदर नोटीस मिळाल्यावर माझी सही आहे. सदर नोटीस मी वाचलेली आहे. सदर नोटीसला नि. **सि.२०** देण्यात आले.

१७. कागदपत्र यादी नि. सि.१४ सोबत अनु. ९ वरील नोटीसची प्रत मला दाखविली सदर नोटीस ही सर्व अतीक्रमण धारकांना पाठविलेली आहे. सदर नोटीस मला प्राप्त झाली आहे. सदर नोटीसला नि.**सि.२१** देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, अंजली हेअर सलुन मध्ये आंम्ही दोघे जण काम करतो. साक्षदार स्वत: सांगतो की, मी एकटाच काम करीत होतो. परंतु तु दुकान सन,२०१७ साली बंद झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुकानामध्ये माझे सोबत अजय चिंचाळकर हा सुध्दा काम करीत होता.

१८. कागदपत्र यादी नि. सि.१४ सोबत अनु. ९ वरील नोटीसची प्रतीची छायांकित प्रत मला दाखविली. हे म्हणणे खरे आहे की सदर नोटीस ही माझेतर्फे अजय चिंचाळकर यांनी स्विकारलेली आहे. सदर नोटीसचे प्रतीला **नि.सि.२२** देण्यात आले. मे,२०१७ साली नगर परीषदेने सदर दुकान पाडले. साक्षदार पुन्हा सांगतो की, नगर परीषदेने २०१७ दुकान पाडले हे मला माहिती आहे. परंतु नेमकी तारीख महिना आठवत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मला दररोज रू. १०००/— रोज पडत होते. सदर दुकानामध्ये मी महिन्याला अंदाजे रू.५ ते ६ हजार पाडत होतो. सदर हेअर सलुनचे दुकान मेन्टन करण्याचा खर्च हा महिन्याचा अंदाजे रू.३०००/— येत होता.

१९. माझे सन,२०१७ ला हटविल्यानंतर मला प्रमोद गोजे यांनी बाजार रोड धर्मापुर येथे दुकान चालविण्याकरीता दिले. सदर दुकान हे भिवापुर येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुकानातुन मला महिन्याला १० हजार उत्पन्न मिळते. साक्षदार स्वत:

सांगतो की, मला दिवसाला रू.२००/— मिळते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुकानामध्ये माझेसाबत एक कारागीर आहे.

२०. नि.यु.११० वरील नियुक्तपत्र मला दाखविले. सदर पत्र मला समाज कल्याण अधिकारी जिल्हा परीषद चंद्रपुर यांचेकडून प्राप्त झाले आहे. नि.यु.११० ची प्रत मला दाखविली. त्याची मुळ प्रत मी दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर पत्रामध्ये टेबर फॉरमॅटच्या बाहेर लिहिलेला मजकुरच्या बाहेर कोणाचीही सही दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कॉलमच्या बाहेरील मजकुर हा मी लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणुन बुजुन चुकीची प्रत सादर केलेली आहे. साक्षदार स्वतः सांगतो की, सदर प्रतीची मी गैरअर्जदार व समाज कल्याण यांना मागीतली परंतु त्यांनी पुरविली नाही.

२१. गैरअर्जदाराने मला यांचे नातेवाईकाचे मुली सोबत लग्न करण्यासाठी दबाव टाकला हे दर्शविण्यासाठी मी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नौकरीवर लागतांना गैरअर्जदाराला ५० हजार रू. डोनेशन दिले हे दाखविण्यासाठी कागदोपत्री कोणताही पुरावा मी रेकॉर्डवर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला गैरअर्जदाराकडून रक्कम रू.२०००/— पगार मिळत होता. हे म्हणणे खरे नाही की, माझी सलुनचा व्यवसाय असल्याने मी गैरअर्जदाराकडे कामावर चाट मारायचो. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्ना अगोदर पासुन हेअर कटींगचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा परीविक्षा कालावधी समाधानकारक रित्या पुर्ण न झाल्यामुळे कामावरून कमी केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार मला शिविगाळ करीत होते हे दर्शविण्यासाठी मी स्वतंत्र तोंडी पुरावा सादर केलेला नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, मला कामावरून कमी केल्यानंतर मी घर चालविण्यापुरते उत्पन्न हे हेअर कटींगचे कामातुन मिळवत आहे. हे म्हणणे खरे नाही की, हेअर कंटीगचे कामातुन मी महीना रू.३०,०००/— कमावित आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण झाला.** श्रवणोत्तर स्वीकृत

**फेरतपास काही नाही.** **स्वा/**

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
दि. २०.०१.२०२६. कामगार न्यायालय, चंद्रपुर